सकाळ

# भारती महाविद्यालयात संविधान दिन

**सकाळ वृत्तसेवा**

आर्णी, ता. २९ : 'संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार यासोबतच नागरिकांची कर्तव्ये यांचे पालन महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थ्यांनी करावे. कुठल्याही तारूण्यसुलभ आकर्षणास बळी न पडता अभ्यासास प्राधान्य देऊन पालकांचे आणि महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे' असे विचार आर्णी येथील तालुका न्यायालयाचे दिवाणी न्यायाधीश एस. एम. एच. शाहिद यांनी केले.

ते राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई रा. भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तालुका विधी सेवा समिती आर्णी यांच्या संयुक्त विद्यमानाने भारती महाविद्यालयामध्ये संविधान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. सर्वप्रथम श्री दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय भारती यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. प्राचार्य डॉ. आर. एम. तातेड व प्रमुख पाहुणे ग्रंथालय प्रमुख डॉ. एस. व्ही. वानखडे, आर्णी तालुका विधी सेवा समितीचे ॲड. के. बी. परदेशी, ॲड. एम.डी. चव्हाण, ॲड. पी. व्ही. चौधरी यांनी समयोचित व्याख्यानातून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रा. एस. एम. आराडे, डॉ. आर. पी. टेकाडे व प्रा. पी. एन. सोनोने यांनी पुढाकार घेतला.




**आर्णी : विचार व्यक्त करताना दिवाणी न्यायाधीश एस. एम. एच. शाहिद व मंचावर उपस्थित मान्यवर.**

Nagpur, Yavatmal-Today
30/11/2021 Page No. 4

# भारती महाविद्यालय आर्णी येथे कोवीड-१९ लसीकरण मोहिमेस सुरुवात



**आर्णी / जनमाध्यम प्रतिनिधी :-** स्व. राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय, आर्णी येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामीण रुग्णालय आर्णी यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयीन विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी मिशन युवा स्वस्थ या मोहिमेअंतर्गत राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमाचे उदघाटन दिनांक २५ ऑक्टोंबर २०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. तातेड, आर्णी तहसीलचे नायबतहसीलदार तुंडलवर साहेब व ग्रामीण रुग्णालय आर्णी येथील वैद्यकीय अधिकारी भवरे साहेब यांच्या हस्ते झाले.

तसेच या मोहिमेला दिनांक २८ ऑक्टोबर ला माननीय अमोल येडगे, जिल्हाअधिकारी, यवतमाळ जिल्हा यांनी भेट दिली व लसीकरण मोहिमेचा आढावा घेतला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्याकरता महाविद्यालयातील लसीकरण मोहिम समिती, राष्ट्रीय सेवा योजना तसेच ग्रामीण रुग्णलाय आर्णी येथील चमू ने परिश्रम घेतले.

# लसीकरण शिबिरास जिल्हाधिकाऱ्यांची भेट

आर्णी, ता. ३० : राजकमलजी भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमलजी भारती विज्ञान महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामीण रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमानाने महाविद्यालयीन विद्यार्थी व कर्मचारी यांच्यासाठी मिशन युवा स्वस्थ या मोहिमेअंतर्गत लसीकरण शिबिर घेण्यात आले. या मोहिमेला गुरूवारी (ता.२८) जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी भेट दिली व लसीकरण मोहिमेचा आढावा घेतला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन सोमवारी (ता.२५) प्राचार्य डॉ. आर. एम. तातेड, नायब तहसीलदार तुंडलवर व ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी भवरे यांच्या हस्ते झाले. या उपक्रमास श्री. दत्त प्रासादिक शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय भारती यांनी शुभेच्छा दिल्या. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील लसीकरण मोहीम समिती, राष्ट्रीय सेवा योजना तसेच ग्रामीण रूग्णलाय आर्णी येथील चमूने पुढाकार घेतला.



आर्णी : लसीकरणाची माहिती घेताना जिल्हाधिकारी येडगे.

सकाळ

## अवतीभवती




आर्णी : ऑनलाईन कार्यक्रमात सहभागी झालेले मान्यवर.

# आर्णी येथील भारती महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन साजरा

**आर्णी :** येथील राजकमल भारती कला, वाणिज्य व श्रीमती सुशीलाबाई राजकमल भारती विज्ञान महाविद्यालयात झूमद्वारे राष्ट्रीय सेवा योजना स्थापनादिन कार्यक्रम ऑनलाइन पद्धतीने शुक्रवारी (ता. २४) झाला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एम. तातेड अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे ग्रंथालयप्रमुख डॉ. एस. व्ही. वानखडे, प्रमुख वक्ते म्हणून डॉ. एन. ए. पीस्तुलकर उपस्थित होते. या कार्यक्रमात प्राध्यापक व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक सहभागी झाले होते. डॉ. एन. ए. पिस्तूलकर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा जडणघडणीचा प्रवास, उद्दिष्टे व जबाबदारी याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. संतोष आराडे , सहायक कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रतीक सोनोने, सहायक कार्यक्रम महिला अधिकारी प्रा. डॉ. रुपाली टेकाडे यांनी पुढाकार घेतला.